नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २५४ Issue - 254 | वार शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ Blow- Friday Date 31 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या घरावर निवडणूक आयोगाची धाड

### आम आदमी पक्षाने केला आरोप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी अवघे काही दिवस उरले असताना राजधानी दिल्लीत राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे. यमुना नदीच्या अस्वच्छ पाण्यावरून शेजारचे हरियाणा राज्य या निवडणुकीत ओढले गेले असताना आत पंजाबलाही यात ओढले गेले आहे. पंजाबचे मुख्यमंत्री आणि 'आप'चे नेते भगवंत मान यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी निवडणूक आयोगाने धाड टाकली असल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे. दरम्यान निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनीही आपली बाजू मांडली आहे. पैसे वाटल्याचा आरोप झाल्यामुळे भरारी पथकाने कपूरथाला निवासस्थानी धडक दिली होती. मात्र त्यांना घरात येऊ दिले नाही.

निवडणूक अधिकारी ओ. पी. पांडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, इथून पैसे वाटप होत असल्याची तक्रार आम्हाला मिळाली होती. १०० मिनिटांच्या आत आम्हाला तक्रारीचे निवारण करायचे असते. आयोगाचे भरारी पथक येथे तपासणीसाठी आले होते. मात्र त्यांना आत जाऊ दिले नाही. त्यामुळेच मला यावे लागले. भरारी पथकाला कॅमेऱ्यांसह आत जाऊ द्यावे, अशी विनंती आम्ही केली आहे.

सीव्हीजील पवरून तक्रार प्राप्त झाल्याचेही पांडे यांनी म्हटले. निवडणूक आयोगाच्या या कारवाईनंतर आता 'आप'कडून जोरदार पलटवार करण्यात येत आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणाले की, भाजपाचे नेते पैसे आणि भेटवस्तू मतदारांना वाटत असताना त्यांना मोकळे सोडून पंजाबच्या मुख्यमंत्र्यांवर धाड टाकण्याचे कारण काय? हे मला समजत नाही.

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही एक्सवर पोस्ट टाकत या घटनेचा निषेध केला आहे. दिल्ली पोलिसांच्या समवेत निवडणूक आयोगाने माझ्या दिल्लीतील निवासस्थानी धाड टाकली. दिल्लीत भाजपाचे नेते राजरोस पैसे वाटप करत आहेत. पण हे पोलीस आणि निवडणूक आयोगाला दिसत नाही. पण आमच्यावर मात्र कारवाई करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भाजपाच्या इशाऱ्यावर दिल्ली पोलीस आणि आयोग पंजाबींना बदनाम करत आहे, हे निषेधार्ह आहे, अशी टीका भगवंत मान यांनी केली.

## महाकुंभमेळ्यात पुन्हा भीषण अग्नीतांडव; १५ टेन्ट आगीच्या भक्ष्यस्थानी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज : महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाल्यानंतर आज आज लागली आहे. प्रयागराज येथील सेक्टर २२ मध्ये ही आग लागली असून या आगीत १५ टेन्ट जळून खाक झाले आहेत. महाकुंभाचा सेक्टर २२ छतनाग घाट आणि झुशीच्या नागेश्वर घाटाच्या दरम्यान येतो. येथे असलेल्या तंबूत अचानक आग लागली. त्यामुळे लोक सावध झाले. याबाबत भाविकांनी अग्निशमन दलाला माहिती दिली. अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी आग विझवण्यास सुरुवात केली. ज्या ठिकाणी आग लागली तेथे कोणीही नागरिक उपस्थित नव्हते त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. मात्र, आग कशामुळे लागली? अद्याप साफसफाई झालेली नाही. बुधवारी म्हणजेच काल मौनी अमावस्येनिमित्त चेंगराचेंगरी झाली होती. यामध्ये ३० जणांचा मृत्यू झाला, तर ६० जण जखमी झाले.



पोलीस अधिकारी प्रमोद शर्मा म्हणाले, मंडपात आग लागल्याची माहिती मिळताच पथक घटनास्थळी पोहोचले. १५ तंबूंना आग लागली. जी नियंत्रणात आणली. ज्या भागात आग लागली तिथे पोहोचण्यास जागा नव्हती. त्यामुळे दलाला पोहोचण्यास थोडा विलंब झाला. परिस्थिती आता नियंत्रणात आहे. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

महाकुंभाच्या जत्रा परिसरात १९ जानेवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आग लागली होती. शास्त्री पुलाजवळ सेक्टर १९ येथील गीता प्रेसच्या कॅम्पमध्ये आग लागली. आगीत गीता प्रेसच्या १८० कॉटेज जळून खाक झाल्या.

### थोडक्यात...

#### चालत्या रेल्वे गाडीतून रुळावर पडल्याने इसमाचा मृत्यू

निफाड : नाशिक बाजू कडून लासलगाव कडे जाणाऱ्या रेल्वे गाडीतून एक अज्ञात इसम पहाटेच्या वेळी रेल्वे रुळावर पडल्याने त्याचे डोक्यास हातापायास ,छातीस, गंभीर दुखापत होऊन मयत झाला असून कुंदेवाडी रेल्वे स्टेशनवर असणारे रेल्वे कर्मचारी यांनी निफाड पोलीस ठाण्यात खबर दिली असून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे, मयत इसमा जवळ एकही ओळखपत्र मिळून नआल्याने मयत इसमाची ओळख पटेना या संदर्भात निफाड पोलीस ठाण्याचे वतीने शोध चालू आहे

सदर अज्ञात ईसमाचे वय अंदाजे २५ वर्ष असून, शरीराने मध्यम, उंची पाच फूट सहा इंच आहे, रंगाने गोरा असून डोक्याचे केस काळे आहे तर डाव्या हाताचे कांबीवर आई व इंग्रजीत पी नाव व उजव्या हातावर पवन सोनाली नाव गोंदलेले आहे अंगात निळ्या रंगाचा शर्ट कमरेस काळ्या रंगाची लांब नाईटपॅन्ट घातलेली असून वरील वर्णनाचा इसम कोणाच्या ओळखीचा असल्यास निफाड पोलीस ठाणे ० २५ ५० /२४ १० ३३ किंवा पो. हवालदार के. पी ढेकळे मोबाईल नंबर ८६ २४ ८० ७१ ३१ या नंबरवर संपर्क साधावा पुढील तपास पो. निरीक्षक गणेश गुरव यांची मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार ढेकळे हे करीत आहे.

## सोलापूर, पंढरपूरसाठी आणखी दोन आवर्तनांस मंजुरी; उजनीतून १२ टीएमसी पाणी सोडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर आणि पंढरपूरसह मंगळवेढा, सांगोला आणि भीमा नदीच्या काठावरील पाणीपुरवठा योजनांसाठी उजनी धरणातून भीमा नदीत सोडण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे १२ टीएमसीचे दुसरे आणि तिसरे आकस्मिक आवर्तन सोडण्यास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंजुरी दिली. दुसरे आवर्तन ५.५० पीएमसीचे तर तिसरे आवर्तन ६.५० टीएमसीचे राहणार आहे. जिल्हास्तरीय आकस्मिक पाणी वापर समितीची बैठक पालकमंत्री गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापुरात नियोजन भवनात झाली. यापूर्वी गेल्या ४ जानेवारी रोजी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उजनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत शेती सिंचनासाठी पाण्याचे पहिले आवर्तन सोडण्यास मंजुरी देण्यात आली होती. तत्पूर्वी, डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात उजनी धरणातून सोलापूर व पंढरपूरसह मंगळवेढा, सांगोला आणि भीमा काठच्या पाणीपुरवठा योजनांसाठी सहा टीएमसी पाणी सोडण्यात आले होते.



यंदा सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासणार नाही. अनुषंगाने जलसंपदा विभागाने उजनी धरण प्रकल्पात उपलब्ध असलेल्या पाण्याचे योग्य नियोजन करावे आणि आवश्यक असलेले पिण्याच्या पाण्याचे आकस्मिक आरक्षण करून ठेवावे, अशा सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या. आजअखेर उजनी धरणात उपयुक्त पाणीसाठा ४०.५९ पीएमसी असून अचल पाणीसाठा ६३.६६ पीएमसी याप्रमाणे एकूण पाणीसाठा १०४.२५ पीएमसी इतका शिल्लक आहे.


या बैठकीस सुभाष देशमुख, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी या आमदारांसह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले, उजनी लाभक्षेत्र प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता एस. एस. खांडेकर, धीरज साळे आदींची उपस्थिती होती.

## जरांगेंचं उपोषण स्थगित; सगे-सोयऱ्यांची अंमलबजावणी न केल्यास मुंबईत आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अंतरवाली सराटी : मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे यांचं उपोषण आता स्थगित करण्यात आलं आहे. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी त्यांना ज्युस दिला आणि त्यांचं उपोषण सोडवलं.

सरकारचे प्रतिनिधी म्हणून अंतरवाली सराटीत आलेल्या आमदार सुरेश धस यांच्याहस्ते ज्यूस पिऊन मनोज जरांगेंनी उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली. मात्र, याचवेळी सरकारने आमच्या मागण्यांसदर्भात लवकरच निर्णय न घेतल्यास पुढील आंदोलन राजधानी मुंबईत करणार असून त्याचीही घोषणा केली जाईल, असा इशाराच सरकारला दिला आहे. आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे आणि प्रकाश सोळंकी यांच्या उपस्थितीत मनोज जरांगे यांनी ज्यूस पिऊन उपोषण सोडलं. यावेळी, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हेही उपस्थित होते.



काही लोक म्हणत आहेत की मनोज जरांगेंच्या उपोषणातून काय मिळाल? पण त्यांचा २४ तास एकच धंदा आहे, त्यांना काही करायचं नाही. राज्य सरकारकडून शिंदे समिती पूर्णपणे बंद करण्यात आली होती. शिंदे समितीच्या मंत्रालयावरील ऑफिसला कुलूप लावण्यात आलं होतं, जे काय मिळालं म्हणत होते ना? घरात बसून नेत्यांचे पाय चाटणाऱ्यांना काय मिळालं ते कळणार नाही, असा टोला काही मराठा समन्वयकांना जरांगे पाटील यांनी लगावला. आता शिंदे समिती राज्यात काम करणार आहे, पूर्ण राज्य आमचं आहे. पण, बीड आणि धाराशिव जिल्ह्यात काही अधिकारी जातीयवादी आहेत, ते मराठा समाजातील तरुणांना प्रमाणपत्र देत नाहीत, त्यांना बडतर्फ केलेलंच बरं असंही जरांगेंनी म्हटलं आहे.

सग्या सोयऱ्यांची अमलबजावणी आम्हाला पाहिजेच आहे. ती झाली नाही तर आता लवकरच मुंबईतल्या आंदोलनाची तारीख जाहीर करणार असल्याचंही मनोज जरांगे म्हणाले. मुंबईत जर आंदोलन सुरु केलं तर तिथून काही माघार घेणार नाही.आपल्याला मुंबईला पोलिसांनी मारलं तरीही पोलिसांना बोट लावायचं नाही. पण, मंत्र्यांना आणि त्यांच्या पोरांना धरायचं आणि हाणायचं असा इशाराच मनोज जरांगेंनी दिला. तसेच, आता हे आंदोलन स्थगित करत आहे, या जागेवर सभामंडप करायचा आहे. यापुढे शक्यतो आता उपोषण करायचं नाही, समोरासमोर लढायचं आहे. लवकर अमलबजावणी न झाल्यास मुंबईची तारीख जाहीर करेन, तेव्हा मुंबई जाम होऊ शकते, यावेळी मराठे मागे येऊ शकत नाहीत, असंही मनोज जरांगे म्हणाले.

### म्हाडा पुणे मंडळातर्फे ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत उत्साहात

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## 'म्हाडा'च्या माध्यमातून दोन वर्षात एक लाख घरे उभारणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी राज्य शासन कटीबद्ध असून येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून सुमारे एक लाख घरांच्या उभारणीचे सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याचे गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ३,६६२ सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री तथा पुणे पालकमंत्री अजित पवार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, म्हाडा पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृश्य प्रणालीद्वारे काढण्यात आली. यावेळी श्री. शिंदे बोलत होते.

विविध योजनांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, या गृहनिर्माण धोरणानुसार सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृह उभारले जाणार आहेत. म्हाडा पुणे मंडळाच्या ३६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित सोडतीसाठी अनामत रकमेसह ७१,६४२ अर्ज प्राप्त झाले आहेत. अर्जदारांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणावर (म्हाडा) दाखवलेला हा विश्वास आहे. अर्जदारांचा हाच विश्वास सार्थ ठरवण्यासाठी घरांच्या गुणवत्ता व सोडतीच्या पारदर्शकतेमध्ये कुठेही तडजोड न करता सोडतीतील विजेत्या अर्जदारांना तात्काळ सदनिकांचा ताबा देण्यात यावा. महाराष्ट्र शासन विविध योजनांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांची निर्मिती करीत आहे.

मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती

'म्हाडा'ने गेल्या दीड वर्षात १३ सोडतींच्या माध्यमातून सुमारे ३० हजार घरे उपलब्ध करून दिली आहेत, ही कौतुकास्पद बाब असल्याचे ते म्हणाले. रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प मार्गी लागावेत व झोपडपट्टी पुनर्विकास व्हावा यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात गृहसाठा उपलब्ध होणार आहे. मुंबई पुणे, ठाणे या शहरांमध्ये समूह पुनर्विकास योजनेद्वारे योजनाबद्ध गृहनिर्मिती करण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले. पुणे येथे देखील समूह पुनर्विकास योजना राबवण्याचे सूतोवाच श्री. शिंदे यांनी केले.

श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पुणे मंडळाने मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.

म्हाडाच्या ािरवरेषषळलळरश्र या अधिकृत यूट्यूब व फेसबूक समाजमाध्यम व्यासपीठांवरुन सोडतीचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. थेट प्रक्षेपण ४८,००० जणांनी बघितले.

सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https:// housing.mhada.gov.in या वेबसाईटवर सायंकाळी ६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती तात्काळ कळविली जाणार आहे.

यावेळी ठाणे जिल्हाधिकारी श्री. अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे, म्हाडा पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे, उपमुख्य अभियंता सुनील ननावरे,अनिल अंकलगी, मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी सविता बोडके, उपमुख्य अधिकारी अतुल खोडे, उपअभियंता मनीषा मोरे आदी उपस्थित होते.

#### सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी कटीबद्ध

**उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले की, मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णतः ऑनलाइन अशा या संगणकीय प्रणालीद्वारे ही सोडत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या नूतन प्रणालीनुसार अर्ज नोंदणीकरण व पात्रता निश्चिती झाल्यानंतरच अर्जदार सोडत प्रक्रियेत सहभागी होतो. सोडतीत विजेता ठरल्यानंतर, अर्जदारास सूचना पत्र पाठविले जाते व त्यातील तरतुदींची पूर्तता केल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र पाठविले जाते. ही सर्व प्रक्रिया अत्यंत सोपी, सुलभ व पारदर्शक असून त्यासाठी कुठलाही मध्यस्थ/दलाल म्हाडाने नेमलेला नाही. म्हाडाचा लाभार्थी ही म्हाडासाठी मोठी गुंतवणूक असून लाभार्थी हेच म्हाडाचे ब्रँड अँबेसिडर आहेत. सर्वसामान्यांच्या गृहस्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र शासन कटीबद्ध असल्याचे श्री. पवार यांनी सांगितले.**

## संपादकीय....

### यंत्रणेची झाडाझडती

राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमची (जीबीएस) रुग्णसंख्या १२७ वर पोहोचली असून, आतापर्यंत दोन रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. सध्या २० रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. दरम्यान, राज्याचे आरोग्य सचिव निपुण विनायक यांनी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत एका बैठकीत पुण्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. पुण्यात जीबीएसची रुग्णसंख्या वाढल्याने आरोग्य सचिव निपुण विनायक हे गुरुवारी पुण्यात दाखल झाले. त्यांनी औंध जिल्हा रुग्णालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयाला भेट दिली. या दोन्ही रुग्णालयांमध्ये दाखल असलेल्या रुग्णांची पाहणी त्यांनी केली. याचबरोबर रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांकडून माहिती घेतली. रुग्णांवरील उपचार आणि औषधांच्या उपलब्धतेबाबत त्यांनी डॉक्टरांना सूचना केल्या, अशी माहिती सूत्रांनी दिली. आरोग्य सचिवांनी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेला भेट दिली. तिथे त्यांनी संस्थेतील शास्त्रज्ञ, शीघ्र प्रतिसाद पथक, केंद्रीय उच्चस्तरीय पथक आणि आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी पुण्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ होण्यामागील कारणांबाबत त्यांनी एनआयव्हीतील शास्त्रज्ञांसोबत चर्चा केली. याचबरोबर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सूचना केल्या, अशी माहिती सूत्रांनी दिली. राज्यात 'जीबीएस'चे १३० रुग्ण झाले आहेत. पुणे महापालिका क्षेत्रात २५ रुग्ण असून, रुग्ण महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील ७४ आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात १३, पुणे ग्रामीणमध्ये ९ आणि इतर जिल्ह्यांतील ९ रुग्ण पुण्यात आहेत. राज्यात सर्वाधिक रुग्ण २० ते ३९ वयोगटातील आहेत. दरम्यान, राज्यातील ७३ रुग्णांचे जीबीएस निदान झाले आहे. आरोग्य विभागाने शहराच्या विविध भागांतील १५४ नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविले होते. त्यापैकी ८ पाणी नमुने पिण्यास अयोग्य आढळले आहेत.

# महात्मा गांधीजी पुण्यतिथी- कुष्ठरोग निवारण दिवस

कुष्ठरोग मुक्त भारत हे महात्मा गांधीजींचे स्वप्न होते, ते नेहमी म्हणत असत की कुष्ठरोग हे माझ्या जीवनातील अपुर्ण राहीलेले कार्य आहे. म्हणुन दरवर्षी दिनांक ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीयस्तरावर कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्यात येतो. व ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी हा पंधरवडा हा कुष्ठरोग निवारण पंधरवडा म्हणून साजरा करण्यात येतो. या कालावधीत कुष्ठरोग विषयी शास्त्रीय माहिती समाजात विविध माध्यमांतून पसरविण्यात येते. व समाजात असलेले कुष्ठरोग विषयी गैरसमज व अंधश्रद्धा दुर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात.

सप्टेंबर २००५ साली कुष्ठरोगाचे दुरीकरण साध्य झाले आहे. म्हणजे कुष्ठरोगाचे प्रमाण दर दहा हजार लोकसंख्येच्या मध्ये एक पेक्षा कमी रूग्ण ईतके आहे. म्हणजे कुष्ठरोग ही समाजाची आरोग्याची समस्या नाही इतकं कमी झाले आहे. तर सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगाचा शुन्य संसर्ग व कुष्ठरोगाचे निर्मुलन करण्याचे ध्येय आहे.

समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे,

नविन सांसर्गिक रूग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडीत करुन होणारा प्रसार कमी करणे,

समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करुन शास्त्रीय माहिती समाजात पसरविणे,

सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे.

कुष्ठरोगावर अद्याप प्रतिबंधक लस उपलब्ध नाही. निर्मुलन साध्य करण्यासाठी प्राथमिक अवस्थेत रुग्ण शोधून उपचार देऊन संसर्गाची साखळी खंडीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

अजुनही रुग्ण स्वताहून तपासणी करून औषधोपचार घेणारे रुग्णाचे प्रमाण अत्यल्प आहे. रुग्ण प्रगत अवस्थेत उपचारासाठी येतो. या मुळे काही प्रमाणात संसर्ग झालेला असतो. परंतु कुष्ठरोग हा कोणत्याही अवस्थेत बहुविध औषधोपचार योग्य व पुरेसा घेतल्यास १०० टक्के बरा होतो. जर उपचार घेण्यास ऊशिर झाला तर विकृती येवू शकते.

कुष्ठरोगाबाबत आजही लोकांमध्ये अनेक गैरसमज व अंधश्रद्धा आहेत. कुष्ठरोग हा अनुवंशिक आहे, शापामुळे, पाप केल्याने होतो, फक्त गरीबांना होतो, महाभयंकर व महा संसर्गकारी आहे, कुष्ठरोगावर उपचार नाही, असे अनेक गैरसमज समाजात आहेत. ते दूर होणे आवश्यक आहे.

कुष्ठरोगाची संशयित लक्षणे -

शरीरावरील कोणताही फिकट पांढरा, लालसर, सपाट/ उंचावलेला बधीर चट्टा किंवा चट्टे,

तेलकट, लालसर त्वचा,

कानाच्या पाळ्या जाड होणे,

तेलकट, लालसर, सुजलेला चेहरा,

हात,पायावर बधिरता, मुंग्या येणे,

स्नायू कमजोर होणे,

भुवयाचे केस विरळ होणे,

हात मनगटापासुन लुळा पडणे,

पाय लुळा पडणे, फरफटत चालणे,

हाताची बोटे वाकडी होणे,

लवकर बरी न होणारी जखम,

त्वचा विलेपन तपासणीत कुष्ठजंतू आढळणे.

आरोग्य सेवेच्या यंत्रणेतील आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी यांचेशी व जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी, ग्रामिण रुग्णालयाशी, जिल्हा रुग्णालय अथवा आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधून कुष्ठरोगांची लक्षणे असलेल्या रुग्णांनी वेळीच उपचार करुन घेणे आवश्यक आहे. सर्व शासकीय, निमशासकीय दवाखान्यात कुष्ठरोगाची तपासणी व औषधोपचार पुर्णपणे मोफत आहे.

कुष्ठरोगाचे निदान -

कुष्ठरोगाचे निदान सर्व शासकीय, निमशासकीय दवाखान्यात दररोज व मोफत केले जाते.

कुष्ठरोगाचे प्रकार - कुष्ठरोगाचे लक्षणानुसार दोन प्रकारात निदान केले जाते.

आसांसर्गिक रुग्ण - १ ते ५ चट्टे किंवा एकच मज्जा बाधित असणारे रुग्ण,

सांसर्गिक रूग्ण - ५ पेक्षा अधिक चट्टे किंवा १ पेक्षा अधिक मज्जा बाधित असणारे रुग्ण , त्वचा विलेपन तपासणीत कुष्ठ जंतू आढळलेले रुग्ण.

कुष्ठरोगावरील उपचार - बहुविध औषधोपचार

असांसर्गिक रुग्णांसाठी - सहा महिने

सांसर्गिक रुग्णांसाठी - बारा महिने

या शिवाय रूग्णास दृश्य विकृती असेल तर पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया करून अवयव निट करण्यात येतो.

पायास बधीरता असेल तर विशिष्ट प्रकारच्या चपला/ सँडल वर्षातून दोन जोड देण्यात येतात.

कुष्ठरोग हा जिवाणूमुळे होणारा सांसर्गिक आजार आहे. कुष्ठरोगात मुख्यतः त्वचा व मज्जा बाधीत होतात. तो कोणालाही - (स्त्री /पुरुष ) होऊ शकतो .हा औषधोपचाराणे कोणत्याही अवस्थेत १०० टक्के पूर्ण बरा होणारा आजार आहे. औषधोपचार घेतला नाही तर त्या रुग्णामार्फत याचा प्रसार होतो आणि रुग्णाला विकृती येऊ शकते. लवकर निदान करून त्वरित औषधोपचार सुरू केला तर औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडीत झाल्याने समाजामध्ये होणारा प्रसार रोखणे सहज शक्य होते.

प्रत्येकाने नियमित आपल्या शरीराची तपासणी स्वतः, आरशात पाहून, नातलगांच्या मदतीने करून घ्यावी. शंका आल्यास जवळपासच्या शासकीय रुग्णालयातून अथवा आपल्या डाँक्टर कडून निदान करून घ्यावे. घरी तपासणी साठी आलेल्या आरोग्य कर्मचारी यांचेकडून तपासणी करुन घ्यावी व कुष्ठरोग निर्मूलनास हातभार लावावा.

कुष्ठरोरुग्ण शोध अभियान २०२५

समाजात असलेल्या प्रत्येक संशयित कुष्ठरुग्णांचा शोध पथकामार्फत शोध घेऊन त्याचे निदान निश्चित केल्यानंतर जर कुष्ठरोग आढळून आला तर त्याला तात्काळ बहुविध औषधोपचार सुरू करून संसर्गाची साखळी खंडीत करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे.

या वर्षी, राज्यातील २० जिल्ह्यात हे अभियान ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्याचा या अभियान राबविण्याचा समावेश आहे. मार्गदर्शक सुचनांनुसार सोलापूर जिल्ह्यातील ३६५७५९० लोकसंख्या प्रत्यक्ष तपासणीसाठी निवडली आहे. तपासणी करण्यासाठी २७६८ स्त्री व पुरुष असलेली पथके निर्माण केली आहेत. ही पथके घरोघरी जाऊन प्रत्येकाची शारीरिक तपासणी करून संशयित कुष्ठरुग्णांचा शोध घेतील. या संशयितांची तपासणी वैद्यकीय अधिकारी यांचेकडून करण्यात येणार आहे. जर कुष्ठरोगाची लक्षणे आढळून आली व कुष्ठरोगाचे निदान निश्चित करण्यात आले तर तात्काळ बहुविध औषधोपचार सुरू करण्यात येणार आहे.

आपल्या घरी येणारे पथकाकडून तपासणी करून घेऊन सहकार्य करावे.

लक्षात असू द्या -

सर्व सांसर्गिक रोगांपैकी कुष्ठरोग हा सर्वात कमी सांसर्गिक रोग आहे.

नियमित, योग्य व पुरेशा औषधोपचाराने कुष्ठरोग पुर्णपणे बरा होतो.

कुष्ठरोग कोणालाही होऊ शकतो.

कुष्ठरोगाचे मोफत निदान व उपचार सर्व शासकीय निमशासकीय रुग्णालयात दररोज होते.

समाजातील प्रत्येक घटकाच्या प्रयत्नाने समाजात कुष्ठरोगा बाबत असलेला भेदभाव दूर करु, सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरोगाचा प्रसार हे ध्येय गाठुन राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या कुष्ठरोग मुक्त भारताकडे वाटचाल करुया.

**- डॉ. मोहन शेगर,**
सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सोलापूर.

# औसा तालुक्यातील वाघोली येथे अखंड हरिनाम सप्ताह संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाघोली : वाघोली येथे गेल्या अकरा वर्षापासुन अविरत पणे अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा साजरा केला जातो. आज सप्ताहनिमीत्त वाघोली गावात पारायण करणार्यानी गावभर ज्ञानेश्वरी डोक्यावर घेउन ज्ञानेश्वरीची शोभायात्रा काडण्यात आली यावेळी महिलां वारकर्यांनी डोक्यावर पाण्याचे कलश घेउन भक्तीभावाने राम कृष्ण हरी, जय जय राम कृष्ण हरी च्या जयघोषात प्रती पंढरपुर प्रमाने भाविकांनी अवघे वाघोली गाव फुलुन गेले होते .यावेळी वारकरी ,महिला, व तरणांणी फुगड्या खेळत उपस्थीतांची मने जींकली , ,वाघोली येथील सप्ताहात श्रीमद भागवत कथेच आयोजन करण्यात आले होते साधवी आरतीताई शिंदे श्रीरामपुर यांच्या सुश्राव्य वानितुन भाविकांना भागवत कथा ऐकण्याचा आंनद भाविकांनी घेतला.

आज ह.भ.प भुजन महाराज तळणी मोहगाव याच्या काल्याच्या किर्तनाने व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता करण्यात आली.

यावेळी सरपंच उषाबाई पंडीत पवार, उपसरपंच गोपीचंद पवार ,वारकरी साहित्य परीषद औसा तालुकाध्यक्ष ह.भ.प,भागवत शेषेराव गोरे, तंटामुक्ती अध्यक्ष पंढरी पवार, कीसन दळवे, बालाजी जाधव, विलास पाटील, संजय चिंचोले निळकंट पाटील, धनाजी पवार, दिपक पवार, बलभिम जाधव, रामेश्वर पाटील, व्यंकट शिंदे, उत्तम पवार सुरेश काञे मुरहारी पाटील, तानाजी पवार, विशाल पवार, विनोद शिंदे, ईश्वर पवार, नागनाथ पवार, शिवाजी शिंदे, मोहन शिंदे, व्यंकट जाधव राजेंद्र पवार गणपतराव पाटील पंढरी जाधव दीलीप पवार, दिलीप जाधव बालाजी पवार, कमलाकर शिंदे, कीसन दळवे बालाजी पवार नागनाथ जाधव, राघवेंद्र जाधव, शामलबाई शिंदे .कमलबाई जाधव, पद्मीनबाई जाधव, रशिका गोरे, गयाबाई जाधव, शिवकन्या गुजले, मंडोधरी पवार, वंदना जाधव, फुलाबाई पवार सह वाघोली गावचे ग्रामस्थ.

# आपण आजही विमानातून प्रवास नाही करत आहोत तर आपण १२२ वर्ष मागे आहोत : महाराष्ट्राचा पॅडम्यान विकास गोपाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबइ/ प्रतिनिधी : वी आर मोअर सोलुशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने महाराष्ट्राच्या डोक्यावर मानाचा तुरा रोवला आहे.

नेटवर्क मार्केटिंग म्हंटल तर कोणाच्या डोक्यात काय येत ते इथे सांगायची गरज नाही , पण या क्षेत्राला नवी पारदर्शक ओळख या कंपनीने निर्माण करून दिली आहे. श्री शणमुखानंद हॉल सायन येथे या कंपनीचा पाचवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात पार पडला .हॉल मध्ये बसण्याची व्यवस्था २७६३ लोकांची आहे पण त्या हून अधिक लोकांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली कारण या कंपनीने गेल्या ५ वर्षात १ लाख हून अधिक महिलांच्या आरोग्याला सुधारित काम केले आहे , सॅनिटरी पॅड च्या माध्यमातून कित्येक महिलांची गर्भ पिशवी वाचवण्याचे अनमोल काम या कंपनीने केले आहे , म्हणून तर या कंपनीचे सी एम डी विकास गोपाळ सर यांना महाराष्ट्राचा




पॅडमॅन म्हणून ओळख लाभली आहे . कोणत्याही कार्यक्रमाला मोठी माणस ही आशीर्वाद रूपाने येतातच तसे इथेही मनीषा तुपे, अनहिता सरनाईक , मनीषा कायंदे, सुहास खामकर यांनी आपली अग्रगण्य उपस्थिती दिली आणि जनमुदायला संबोधित केले, एखाद्या कंपनीचा कार्यक्रम म्हटल की ती मोठी भाषण , याने एव्हढे कमाविले त्याने तेवढे कमविले असे कोणतेही चित्र इथे पाहायला दिसले नाही उलट या वरमोरे सोलुशन प्रायव्हेट लिमिटेड लकी ड्रॉ माध्यमातून उघड पणे उपस्थित लोकांना ५० लाखाची बक्षीस वाटली त्या मध्ये कार, स्कूटी, मोबाईल, एल ई डी टिव्ही हे सर्व लकी कूपन द्वारे वाटण्यात आले आणि कंपनी मध्ये कामकरणाऱ्या अनेक लोकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले ,

पाच वर्षा आधी एका छोट्या ऑफिस मधून झालेली सुरुवात श्री. विकास गोपाळ सर आणि प्रिया कड यांनी उभ रोवलेले रोपटे आज भव्य दिव्य वृक्ष झालं, मित्रानो हे सांगण्यामागे एकच कारण आहे की खूप कंपन्या आल्या आणि आपल पोट भरल तेव्हा पळून गेल्या पण लोकांचे पोट आणि आरोग्य यावर भर देऊन त्यांची काळजी घेणारी ही एकमेव कंपनी आहे जिने इतिहास रचला आहे.

विकास गोपाळ यांनी सर्वांना संबोधित करताना सर्वांच्या डोळ्यां मध्ये झणझणीत अंजन घातल ते म्हणाले की , विमानाचा शोध १७ डिसेंबर १९०३ ला लागला आणि आज त्याला १२२ वर्ष झाली एवढ्या वर्षात जर आपण त्या विमानात बसले नसलं तर आपण १२२ वर्ष मागे आहोत जागे व्हा आणि आर्थिक सक्षम व्हा ही कंपनी तुमची आहे कामाला सुरुवात करा आणि पुढे जा संकल्प करा आणि आताच ठरवा मला ज्या अडचणी आहे त्या अडचणी येणाऱ्या ३ वर्षात नसणार असे बोलताच उपस्थितीत लोकांच्या डोळ्यात आनंद आश्रु आले.

प्रिया कड मॅडम यांनी सर्वोत्तम महिला उद्योजक म्हणून खरा बहुमान मिळवला . ही दोन माणस आज आभाळाला गवसणी घालत आहेत पण आपले पाय जमिनींत रोवले आहेत . अशी कंपनी आणि असे एम डी असणे म्हणजे उज्वल भविष्याची बांधणी आहे.

# रिक्षामध्ये बसलेल्या अज्ञात महिलेने सोन्याचे दागिने पळविले

सोलापूर/प्रतिनिधी : रिक्षामध्ये बसून मंगळवार पेठकडे जात असताना फिर्यादी राधा एकनाथ चौधरी (वय-५१,रा.यशराज नगर,अक्कलकोट रोड) यांच्या पर्स मधून रिक्षा मधील एका अनोळखी महिलेने प्रवासादरम्यान सोन्याचे गंठण व सोन्याचे कानातील टॉप्स असा १ लाख ४७ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना २८ जानेवारी रोजी दुपारी सव्वा एक ते पावणे दोन वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी राधा चौधरी यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहे.

## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे ह्यांच्या हस्ते सन्मानित

# डोहोळे ग्रामपंचायतीला आर.आर.आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे ग्रामपंचायतीला आर .आर .आबा .पाटील सुंदर गाव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.तर संपूर्ण भिवंडी तालुक्यात डोहोळे ग्रामपंचायत प्रथम स्मार्ट गाव म्हणून शासनाकडून घोषित झाले असून, प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच ठाणे जिल्हाचे पालक मंत्री एकनाथ शिंदे ह्यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांच्या उपस्थितित प्रजासत्ताक दिनानिमित्त डोहोळे ग्रामपंचायतिला



बक्षिस रुपी दहा लाख रुपये तसेच सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

डोहोळे ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी शासनाच्या मार्गदर्शक बाबींचा अभ्यास करून, गावातील अत्यावश्यक गरजा लक्षात घेऊन, लोकहिताच्या कामांवर सर्व पदाधिकाऱ्यांचे लक्ष असते. तर नागरिकांच्या सर्वांगीण विकासाकरिता आवश्यक त्या बाबी ग्रामपंचायत उपलब्ध करून दिल्या. याच बाबींची शासन स्तरावर दखल घेऊन डोहोळे ग्रामपंचायतीला आर.आर.आबा पाटील सुंदर स्मार्ट गाव पुरस्कार मिळाला आहे. तर विविध स्तरावर डोहोळे ग्रामपंचायतचे अभिनंदन होत आहे.

या पुरस्कार सोहळ्यासाठी डोहोळे ग्रामपंचायतिच्या सरपंच सुमन वाघे, उपसरपंच दिनेश ठाकरे, माजी सरपंच तथा विद्यमान सभासद सचिन घोडविंदे,सदस्य ज्ञानेश्वर ठाकरे, शुद्धोदन जाधव तसेच ग्रामस्थ वासुदेव शिंदे उपस्थित होते.

शासनाच्या सूचनांचे पालन करून आम्ही त्या पद्धतीने गावात सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य,कर्मचारी यांच्या सहकार्याने उपायोजना केली. सामाजिक बांधिलकीने काम करत गेलो.तर तर जिल्हा स्मार्ट ग्राम टिम सुद्धा भेट देऊन गेली असून चालू वर्षी माझी वसुंधरा अभियान बक्षीस बाबत देखील शासन स्तरावर सकारात्मक भूमिका आहे असे डोहोळे ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांनी बोलताना सांगितले.

# टाकळीवाडी परिसरात शेतीच्या कामासाठी मजुरांचा तुटवडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




टाकळीवाडी/ प्रतिनिधी : टाकळीवाडी व परिसरामध्ये शेतीच्या कामासाठी मजुरांची तुटवडा भासत आहे. अनेक मजूर सध्या ऊसतोड सुरू असल्यामुळे ऊस तोडी मध्ये व्यस्त आहेत. दिवसेंदिवस मजुरांची संख्या कमी होत चाललेली आहे. तरुण वर्ग शेतीच्या कामाकडे येत नाहीत.

शेतकऱ्यांची शेतीची कामे वेळेवर होत नाहीत.त्यामुळे उत्पादनावर त्याचा परिणाम होत आहे. शेतीच्या कामांमध्ये बी,बियाणे पेरणे, औषध फवारणी, लागण करणे ,सरी सुधारणे ,खते शेतामध्ये टाकणे,असे बरेच कामे मुजरा अभावी वेळेत होत नाहीत. शेतकरी हवालदिल झालेला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

### जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ चा निधी

# मार्च अखेर खर्च करण्यासाठी यंत्रणानी काटेकोरपणे नियोजन करावे

## ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश




**■ जिल्हा वार्षिक योजना सन २०२५- २६ च्या १ हजार १९ कोटी ३३ लाखाच्या विकास आराखड्यास नियोजन समितीची मान्यता, २०० कोटीचे आर्थिक वाढीव मागणी करण्यात आलेली आहे.**

**■ नियोजन समितीकडून मंजूर असलेला निधी वेळेत खर्च करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखाची राहील**

**■ जिल्ह्यातील आठ तीर्थक्षेत्रांना 'क' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा समितीने दिला**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा वार्षिक योजना सन २०२४ २५ अंतर्गत सर्वसाधारण योजना ८३ टक्के, अनुसूचित जाती उपयोजना ५१ टक्के व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना २७% असा एकूण ७८ टक्के निधी २० जानेवारी पर्यंत खर्च झालेला आहे. तरी उर्वरित मंजूर निधी माहे मार्च २०२५ अखेर पर्यंत खर्च करण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची असून त्यासाठी काटेकोरपणे नियोजन करावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, खासदार धैर्यशील मोहिते पाटील( ऑनलाईन द्वारे) खासदार ओम प्रकाश राजे निंबाळकर, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवतडे, सचिन कल्याणशेट्टी, दिलीप सोपल, राजू खरे, अभिजीत पाटील, उत्तम जानकर, डॉ. बाबासाहेब देशमुख, नारायण पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्या सह सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले की सन २०२४ -२५ चा १००% निधी खर्च करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी अधिक गतीने काम करावे. ज्या यंत्रणांनी अद्याप प्रशासकीय मागणीसाठी आवश्यक कार्यवाही केली नाही त्यांनी ती तातडीने पूर्ण करावी. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सर्वांच्या सहकार्यातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करूयात, यामध्ये सर्व समिती सदस्यांची भूमिका ही महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण ८६१.८९ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १५२ कोटी तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ५.४४ कोटी अशा एकूण १ हजार १९ कोटी ३३ लाखाच्या प्रारूप आराखड्यास राज्य समिती समोर सादर करण्यासाठी समितीने मान्यता दिल्याचे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले. शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता ६६१.८९ कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला आहे.

तसेच शिक्षण, आरोग्य, रस्ते विकास, नगरविकास, जनसुविधा यासारख्या महत्वाच्या बाबींकरीता २०० कोटींची अतिरिक्त मागणीचा पुरक आराखडा सादर केल्याची माहिति त्यांनी दिली.

हे शासन शेतकऱ्याचे असून शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम न मिळणे हे खूप गंभीर बाब आहे या बाबीची चौकशी करून सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करावा. शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचेही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले. तसेच बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी दिरंगाई न करता वेळेत कर्जपुरवठा करावा. आरोग्य विभागात नियोजन समितीच्या मान्यतेशिवाय कामे झाली असतील तर त्याची चौकशी करून अहवाल सादर करावा असेही त्यांनी सुचित केले. त्याप्रमाणेच आजच्या बैठकीत समितीच्या वतीने आठ क वर्ग तीर्थक्षेत्रांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. महसूल प्रशासन पोलीस प्रशासन त्यांनी वाळू तस्करावर कडक कारवाई करावी असेही निर्देश त्यांनी दिले.

यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधी यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नियोजन समितीतून निधी मिळणे, जुनी कामे वेळेत मार्गे लावणे, शेतकऱ्यांना पीक विमा मिळणे, पीक कर्जाचा पुरवठा बँकांनी करणे, पाणीपुरवठा योजनेच्या बिलापोटी निधी मिळणे, पंधरावा वित्त आयोगाच्या निधी वाटप, कृषी यांत्रिकीकरण, ठिबक अनुदान, नियमित कर्ज पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर अनुदान मिळणे, रोहित्र दुरुस्तीसाठी निधी मिळणे, तीर्थक्षेत्रांना मान्यता देणे, नवबौद्ध घटकाच्या योजनांसाठी निधी उपलब्ध करणे, दुहेरी पाईपलाईनच्या अनुषंगाने त्वरित कारवाई करणे, क्रीडा विभाग व आरोग्य विभागात समितीच्या निधीतून प्रस्तावित केलेल्या कामांची चौकशी करणे आदी मागण्या करून या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करणे बाबत पालकमंत्री महोदयांनी लक्ष घालण्याचे मागणी करण्यात आली.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२४ -२५ व सन २०२५ २६ बाबत बैठकीत माहिती दिली. तर जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी समिती समोरील विषयाचे वाचन केले.

**सन २०२४-२५ दि. २०. जानेवारी २०२५ अखेरच्या खर्चाचा योजनानिहाय तपशिल :-**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) करीता - अर्थ संकल्पीय तरतूद- ७०२ कोटी, प्रशासकीय मान्यता रक्कम- ६२०.९० कोटी, प्राप्त एकूण निधी - २८०.८० कोटी, एकूण वितरीत निधी - २५९.१५ कोटी, एकूण खर्च - २३३.४५ कोटी, खर्च टक्केवारी प्राप्त तरतुदींशी - ८३ टक्के.

अनुसूचित जाती उपयोजना करीता - अर्थ संकल्पीय तरतूद- १५२ कोटी, प्रशासकीय मान्यता रक्कम- ११९.२६ कोटी, प्राप्त एकूण निधी - ५२.१६ कोटी, एकूण वितरीत निधी -४८.२८ कोटी, एकूण खर्च - २६.५० कोटी, खर्च टक्केवारी प्राप्त तरतुदींशी - ५१ टक्के.

आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना करीता - अर्थ संकल्पीय तरतूद- ४.२८ कोटी, प्रशासकीय मान्यता रक्कम- १.८९ कोटी, प्राप्त एकूण निधी -१.७१ कोटी, एकूण वितरीत निधी -०.९७ कोटी, एकूण खर्च - ०.४६ कोटी, खर्च टक्केवारी प्राप्त तरतुदींशी - २७ टक्के

जिल्हा वार्षिक योजना- सन २०२५-२६:-

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) करीता - राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - ६६१.८९ कोटी, यंत्रणांची मागणी - १६१०.९० कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत - ६६१.८९ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी - २०० कोटी, एकूण आराखडा - ८६१.८९ कोटी.

अनुसूचित जाती उपयोजना करीता - राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - १५२ कोटी, यंत्रणांची मागणी - १७२.८० कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत - १५२ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी - ०.०० कोटी, एकूण आराखडा - १५२ कोटी.

आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना करीता - राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - ५.४४ कोटी, यंत्रणांची मागणी - ५.४४ कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत - ५.४४ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी - ०.०० कोटी, एकूण आराखडा - ५.४४ कोटी.

जिल्हा वार्षिक योजना ( सर्वसाधारण ) सन २०२५-२६ प्रारुप आराखड्याची ठळक वैशिष्टे:-

■ कृषी व संलग्न सेवा (पशुसंवर्धन,मत्स्यव्यवसाय,वने,सहकार) - रुपये ५०.२६ कोटी

ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या योजना - रुपये ६० कोटी

जलसंधारण विभागाच्या योजना - रुपये ५५ कोटी

ऊर्जा विकास ( चडएइ व अपारंपारीक ऊर्जा) - रुपये ६० कोटी

शिक्षण विभागाच्या योजना - रुपये ३९ कोटी

महिला ब बाल विकासाच्या योजना - रुपये १९.८५ कोटी

आरोग्य सेवांचे बळकटीकरण - रुपये ६३.१५ कोटी

नगर विकासाच्या योजना - रुपये १०६ कोटी

रस्ते व परिवहन - रुपये ६८.२० कोटी

पर्यटन, तिर्थक्षेत्र,गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास - रुपये . ४६.२० कोटी

पोलिस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण रुपये - २१.८५ कोटी

### जिल्ह्यातील आठ तीर्थक्षेत्रांना समितीची मान्यता...

- श्री. क्षेत्र जकराया देवस्थान, मौजे-तेलगाव (सिना), ता. उ. सोलापूर
- श्री. क्षेत्र कानिफनाथ देवस्थान, मौजे-गाताची वाडी, ता. बार्शी
- श्री. क्षेत्र म्हस्कोबा देवस्थान, मौजे- लक्ष्मी दहीवडी, ता. मंगळवेढा
- श्री. क्षेत्र महालिंगराया देवस्थान, मौजे-मरवडे, ता. मंगळवेढा
- श्री. क्षेत्र गुरुगंगालिंग महाराज मंदिर देवस्थान, मौजे हिळळी ता. अक्कलकोट
- श्री. क्षेत्र विठ्ठल रुक्मिणी व मारुती मंदिर देवस्थान, मौजे जाधववाडी, ता. पंढरपूर
- श्री. क्षेत्र शिव शिवाई देवस्थान, मौजे कोरफळे, ता. बार्शी
- श्री. क्षेत्र बिरोबा देवस्थान, मौजे तपकिरी शेटफळ, ता. पंढरपूर

## थोडक्यात...

### रिक्षा पलटी झाल्याने दोन विद्यार्थिनी जखमी

सोलापूर, (प्रतिनिधी) : भवानी पेठ येथे रिक्षा पलटी होऊन दोन विद्यार्थिनी जखमी झाल्याची घटना २७ जानेवारी रोजी घडली.याप्रकरणी श्वेतांबरी सतीश खरटमल (वय-१७-,रा. भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून रिक्षा क्रमांक एम एच.२३.जी ९१६८ या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



या अधिक माहिती अशी की,फिर्यादी व फिर्यादीची मैत्रीण रेणुका बागदुरे ही रिक्षा घेऊन कॉलेजला जाण्यासाठी फिर्यादीच्या घरी आली.तेव्हा रिक्षा चालक हा जोरात रिक्षा चालवत होता.त्याला फिर्यादीनी रिक्षा हळू चालविण्यास सांगितले,असता त्याने तशीच रिक्षा जोरात चालविली.एस.व्ही.सी.एस हायस्कूल प्रियंका चौक येथे रिक्षा पलटी होऊन दोघी विद्यार्थिनी यात गंभीर जखमी झाल्या असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार दुधाळे हे करीत आहेत.

## शेलगाव (वा) तालुका करमाळा येथे केळी संशोधन केंद्र, उती संवर्धन-प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्यास मंजुरी मिळावी-आमदार नारायण पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :शेलगाव (वा) तालुका करमाळा येथे केळी संशोधन केंद्र वृत्ती संवर्धन-प्रयोगशाळा व केळी प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी मंजुरी मिळावी अशी मागणी आमदार नारायण पाटील यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची मुंबई येथे भेट घेऊन केले आहे यावेळी मंत्री महोदय यांनी तपासून मंजुरी देण्यात यावी असे संबंधितांना निर्देश दिले.



करमाळा तालुक्यामध्ये केळी पिका खालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. सोलापूर जिल्ह्यात केळी पिकांसाठी असणारी पोषक वातावरण आणि मोठ्या प्रमाणात वाढत असलेली केळी पिकाखालील क्षेत्र यांचा विचार करता करमाळा तालुक्यातील केळी संशोधन केंद्र होणे गरजेचे आहे व करमाळा तालुक्यातील मोठ्या प्रमाणात निर्यात केळीचे उत्पादन होऊन या खाती देशाबरोबरच युरोपियन देशांमध्ये ही केळीचे निर्यात होत आहे करमाळा तालुक्यातील सन २०२१/२२ मध्ये ६७ ३१ हेक्टर व सन २०२२ २३ मध्ये ६९ ७८ हेक्टर सन २०२३ २४ मध्ये ७३ हेक्टर एवढ्या क्षेत्रावर केळी पिकाची लागवड केल्याची कृषी विभागाचे नमूद असून सरासरी उत्पादकता ६९ टन प्रती हेक्टर आहे करमाळा तालुक्यामध्ये गोल्ड स्टोरेज व बॅग हाऊस ची संख्या झिरो नऊ इतके असून त्यांची साठवण क्षमता २५०० मॅट्रिक टन आहे करमाळा तालुक्यात मौजे कंदर वाशिंबे , वरखटणे, जेऊर, येथून सुमारे ८००० कंटेनर मधून एक लाख साठ हजार बॅटरी टन वजनाच्या केळीची निर्यात झालेली आहे तसेच केळी फळावर प्रक्रिया करून वेफर्स इतर उत्पादने काढली जातात.

परंतु केळी या पिकासाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याने कुशल मजुरांसाठी प्रशिक्षण केंद्र मृदू व जल परीक्षण केंद्र खत तपासणी प्रयोगशाळा नवनवीन वाहनांची निर्मिती दर्जेदार रोपांची निर्मिती होण्यासाठी केळी संशोधन केंद्राची उलटी संशोधन प्रयोगशाळेची आवश्यकता आहे.

शेलगाव वा तालुका करमाळा येथे केळी संशोधन केंद्र वृत्ती संशोधन प्रयोगशाळेची उभारण्या मंजुरी देण्यात यावी अशी मागणी कृषिमंत्री यांच्याकडे केली आहे.

## महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक : डॉ. नेहा सोनवणे

### के.के.वाघ महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत आरोग्यविषयक जागृकता व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : काबाडकष्ट करणाऱ्या महिला असो की नोकरवर्गीय महिला यांना कष्ट करण्याची सवय होऊन गेलेली असते. त्यांची जीवनशैली वेगवेगळ्या ताणतणावांनी ग्रस्त असते. स्वत:कडे लक्ष न देणे, आहाराचे योग्य नियोजन न करणे. त्यामुळे आरोग्याची समस्या उद्भवून आजारांना सामारे जावे लागते आहे. म्हणून महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता स्वत:च स्वत:ची काळजी घेणे आवश्यक झाले आहे. असे प्रतिपादन डॉ. नेहा सोनवणे यांनी केले.

के. के. वाघ महाविद्यालय काकासाहेबनगर येथे महिला तक्रार निवारण कक्ष अंतर्गत विद्यार्थिनींसाठी 'आरोग्य विषयक जागरूकता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. आपल्या व्याख्यानातून महिलांचे मानसिक व शारीरिक आरोग्य ,शरीराला आवश्यक असलेले पोषक घटक आणि वैयक्तिक स्वछ्ता; याविषयी मौलीक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. ए.एस. गवारे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला तक्रार निवारण कक्ष समन्वयक प्रा. वैशाली पगार यांनी केले. , प्रा.पूजा खडताळे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. प्रा. अंकिता पवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तर आभार प्रा.श्वेता शहाणे यांनी मानले.

सदर कार्यक्रमाला संगणक विज्ञान विभाग प्रमुख प्रा. शीतल जगताप, प्रा.किरण वाघ, प्रा.श्वेता शहाणे,प्रा.भारती कुशारे ,प्रा.जयश्री कापडी, प्रा.वेदिका महाले, प्रा. पूजा वाढवणे, प्रा.सचिन मोरे, प्रा. कविता कोल्हे, श्री मुकुंद बागुल, . सचिन काळे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्माचारी उपस्थित होते.

### चोरट्याने पळविली दुचाकी

सोलापूर/प्रतिनिधी : रेल्वे लाईन येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. डी.पी.७६४८ ही चोरून नेल्याची घटना २४ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी बाबू जगलेकर (वय-३१,रा.जगजीवनराम झोपडपट्टी मोदीखाना) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### स्वेरीमध्ये 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' संपन्न

### 'मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार'

# मराठी भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी सर्वस्वी आपली : डॉ. यशपाल खेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'मराठी आपली भाषा आहे. या भाषेच्या संवर्धनाची जबाबदारी सर्वस्वी मराठी माणूस म्हणून आपली आहे. या भाषेला आता अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने मराठी भाषेच्या अनुषंगाने सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा अनेक विषयात संशोधन घडून नवे विचार प्रवाह विकसित होत आहेत ज्यातून मराठी भाषा संवर्धनाला नक्कीच हातभार लागेल.' असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षाचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि मुंबई येथील डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, मुंबई यांच्या सूचनेनुसार 'मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार' करण्याकरीता दि.१४ ते दि.२८ जानेवारी २०२५ दरम्यान 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा) यांच्या संयुक्त विद्यमाने 'मातृभाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात आला. याच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.खेडकर मार्गदर्शन करत होते.

प्रास्ताविकात अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील म्हणाले की, 'मराठी मातीत आपण जन्मलो असल्यामुळे आपण मराठी भाषेतून संवाद साधला पाहिजे. आपण अभियांत्रिकीमध्ये शिक्षण घेत असलो तरी मराठी भाषेला विसरता कामा नये.' असे सांगून त्यांनी मराठी आणि इंग्रजी भाषेचे महत्व स्पष्ट केले. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार म्हणाल्या की, 'आपल्या भाषेवर प्रभुत्व मिळवायचे असेल तर अवांतर वाचन करणे आवश्यक आहे. आपण मागच्या आठवड्यात शासनाच्या सूचनेनुसार 'वाचन सप्ताह' आयोजित केला होता. त्यातूनही आपल्याला शिकता आले. अवांतर वाचन करता आले. वाचनामुळे आपल्या व्यक्तिमत्व विकासात भर पडते. वाचनामुळे उत्सुकता आणि जागरूकता निर्माण होते. वाचनामुळे करिअर करण्यासाठी योग्य दिशा मिळते. यासाठी विद्यार्थ्यांनी 'मोबाईल, टीव्ही व तथाकथित मित्र' हे सर्व सोडून पुस्तकांशी मैत्री करावी. पुस्तके आपल्याला तारतात. वाचनामुळे पुढील आयुष्य देखील सुखकर होते.' असे त्यांनी सांगितले.





पुढे बोलताना प्रमुख मार्गदर्शक डॉ. खेडकर म्हणाले की, 'भाषांतर करण्याचे सामर्थ्य निर्माण होणे आवश्यक आहे. अनेक विषय हाताळण्यात मराठी भाषा अधिक प्रगल्भ आहे,' असे सांगून त्यांनी 'तद्भव व तत्सम' शब्दांची व्याख्या स्पष्ट केली.

डॉ.खेडकर यांनी आपल्या भाषणातून, संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, नामवंत लेखक यांची अनेक उदाहरणे देऊन मराठी भाषा संवर्धन करणे गरजेचे आहे.' हे स्पष्ट केले. या कार्यक्रमासाठी स्वेरीचे विद्यार्थी तसेच ग्रंथपाल प्रा. सतीश बागल, अमोल रोंगे, सतीश अनपट, सुधीर मोरे, दत्तात्रय आसबे आदी उपस्थित होते. प्रा.सुजित इनामदार यांनी सूत्रसंचालन केले तर डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्रा.अमेय भातलवंडे यांनी आभार मानले.

# जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार समाधान आवताडे ॲक्शन मोडवर

## पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांचेसमोर भ्रष्ट अधिकाऱ्यांना फोडला घाम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रतिनिधी-जिल्हा नियोजन भवन, सोलापूर येथे राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीप्रसंगी पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी उपस्थित राहून मतदारसंघातील तसेच समग्र जिल्ह्यातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आपल्या मागण्या पालकमंत्री ना.गोरे यांच्यासमोर उपस्थित केल्या.

सदर बैठकीमध्ये आपल्या मागण्या मांडत असताना आमदार आवताडे यांनी सांगितले की मागील नियोजन समितीच्या बैठकीमध्ये आमदार आवताडे जिल्हा पातळीवरील पीक विमा संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी संबंधित जिल्हा कृषी अधिकारी यांनी उत्तरादखल सांगितले होते की, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी समवेत बैठक घेतली असे सांगितले असता बैठक कधी संपन्न झाली ? सदर बैठकीसाठी कोणत्या लोकप्रतिनिधीला आमंत्रित केले होते ? असे सवाल आमदार आवताडे यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचेसमवेत उपस्थित केले असता त्यावर अधिकाऱ्यांनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला तदवेळी कृषी अधिकारी यांना पालकमंत्री ना. गोरे यांनी खडे बोल सुनावत कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसेच खात्याच्या अनुषंगाने बैठकीमध्ये जी चर्चा होते त्यावर योग्य तो तोडगा काढत कार्यवाही करणे बंधनकारक राहील असेही मंत्री महोदय यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यातील विविध शासकीय आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्र मध्ये नवनियुक्त डॉक्टर भरती करत असताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले यांनी गुणवत्तेचे अथवा वैद्यकीय डिग्रीचे सगळे नियम धाब्यावर बसून पैसे घेऊन या डॉक्टरांची भरती केल्याचे आमदार आवताडे यांनी निदर्शनास आणताच संबंधित आरोग्य अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश प्रस्तावित करण्याचे मंत्री महोदय यांनी यावेळी सांगितले. शिवाय या आरोग्य अधिकारी यांनी मंजूर आरोग्य केंद्रांची प्रशासकीय मान्यता देत असताना मोठ्या प्रमाणात आर्थिक कमिशन घेऊन त्या दिल्याचेही यावेळेस आमदार महोदय यांनी आ.सचिन कल्याणशेट्टी सोबतीने निदर्शनास आले आहे. या प्रकरणातील अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याचे ही पालकमंत्री ना. गोरे यांनी आदेशित केले आहे.

राज्य व केंद्र सरकारची महत्वकांक्षी असणारी घरकुल योजनेचा गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना फायदा मिळण्यासाठी ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर आहे परंतु स्व-मालकीची जागा नाही त्यांना शासकीय धोरणाद्वारे जागा मिळण्यासाठी शासन ५० हजार अनुदान व बांधकामासाठी वाळू देण्याची तरतूद आहे. परंतु या संदर्भात व्यापक बैठक घेऊन सदर अनुदान वाढीव करून देण्याची आमदार आवताडे यांनी मागणी केली असता त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे पालकमंत्री ना. गोरे यांनी यावेळी सांगितले.

> **निरनिराळ्या क्रीडा कौशल्य प्रकारांना गती मिळण्यासाठी आणि जिल्ह्यातील क्रीडा विश्वाला गतवैभव प्राप्त मिळवून शासन निर्गमित जे नवीन प्रस्ताव तयार केले जातात ते देण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार व इतर अधिकारी या संदर्भात पैशांची मागणी करून ते प्रस्ताव देतात असे निदर्शनास आल्यानंतर जिल्हा क्रीडा अधिकारी पवार व इतर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पालकमंत्री ना. गोरे यांनी यावेळी दिले आहेत.**

दुष्काळी तालुके अशी आ-ळख असणाऱ्या मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील पाणीप्रश्न अनुषंगाने म्हैसाळ योजनेतून आवर्तने सुरू करून मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील तलावभरून द्यावे तसेच पाणी वाटपात आमच्यावर होणारा अन्याय थांबून आम्हाला आमच्या हक्काचे पाणी येण्याची मागणी आमदार आवताडे यांनी यावेळी केली त्यावर या प्रश्नावर आपण पालकमंत्री या नात्याने राज्याचे जलसंपदा मंत्री यांच्याशी योग्य ती चर्चा करून अपेक्षित तोडगा काढू असे मंत्री ना.गोरे यांनी सांगितले.

संपूर्ण जिल्ह्यात क वर्गातील एकूण ५१२ देवस्थान असून त्यांना आतापर्यंत ७ कोटी अनुदान होते आता त्यामध्ये वाढ करुन ती मर्यादा १५ कोटी करण्यात आल्याने आपल्या तालुक्यातील महत्वपूर्ण आणि असंख्य भक्तांचे श्रद्धास्थान लक्ष्मी दहिवडी येथील म्हस्कोबा, मरवडे येथील महालिंगराया तसेच शेटफळ (त) येथील बिरोबा देवस्थान यांना आमदार आवताडे यांच्या शिफारशीने क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा प्राप्त होऊन त्यांचा तीर्थक्षेत्र निधी १५ कोटी मंजूर झाला आहे. शिवाय ३०५४ योजनेअंतर्गत जे रस्ते केले जातात त्यामध्ये तसेच शेतकऱ्यांना मिळणारे डीपी यामध्ये वाढ करुन मिळावी अशी मागणी आमदार आवताडे यांचेसमवेत इतर लोकप्रतिनिधी यांनी केली असता त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन



देण्यात आले. मंगळवेढा तालुक्यातील भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या सौर ऊर्जा प्रकल्प मधील कामे गेल्या दोन वर्षांपासून अतिशय संथ गतीने सुरु असून त्या कामांची गती वाढवून लवकरात-लवकर कामे पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी व आंधळगाव पाणीपुरवठा योजना लवकरच कार्यान्वित करण्यासाठी कनेक्शन जोडणीचे काम त्वरित करण्याचे यावेळी आश्वस्त करण्यात आले.

या बैठीकीसाठी आमदार सुभाष बापू देशमुख, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार दिलीप सोपल, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार उत्तम जानकर, आमदार नारायण पाटील, आमदार राजाभाऊ खरे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजित पाटील, आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, तसेच जिल्हा पातळीवरील सर्व प्रशासकीय अधिकारी तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### घरासमोरून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : हॅण्डल लॉक केलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. एएस.३५४३ ही घरासमोर हॅंडल लॉक करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १० ते ११ जानेवारी दरम्यान दक्षिण कसबा दत्त





चौक नवी पेठ)येथे घडली. याप्रकरणी डॉ.अशोक महादेव पटवर्धन (वय-७२-,दक्षिण कसबा,दत्त चौक,नवी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

तसेच दुसरी घटना ही पंचकट्टा सिद्धेश्वर पेठ येथे दि.२२ जानेवारी रोजी रात्री नऊ ते अकरा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी दिलीप नरसिंह बन्ने (वय-६६,रा.उत्तर कसबा,पत्रा तालीम जवळ) यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३.ए.डब्ल्यू.५४४८ ही हॅंडल लॉक करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी दिलीप बन्ने यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार शेळके या करीत आहेत.

# अक्कलकोटमध्ये मोबाईल चोरी करणारी टोळी सक्रिय, त्वरित बंदोबस्त करा : संजय देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट :



अक्कलकोट शहरात गेल्या तीन दिवसांपासून मोबाईल चोरणारी टोळी सक्रिय झाले असून अनेकांचे मोबाईल चोरीला गेले आहेत. गर्दीच्या ठिकाणी सोमवार बाजार येथुन ८ जणांचे मोबाईल चोरीला गेले आहे त्यात शिवसेना विधानसभा संघटक प्रा सुर्यकांत कडबगावकर यांचाही समावेश आहे.

सोमवारी कांदा बाजारात मोबाईल चोरणारी टोळी सक्रिय होऊन सायंकाळी पाच ते सहा वाजता आठ जणांचे मोबाईल चोरीला गेले. स्वामी समर्थ मंदिर परिसर, एस टी स्टॅण्ड येथेही अनेकांचे मोबाईल चोरीला गेली आहेत त्यामुळे लोका मधे व भाविकामधे भयाचे वातावरण निर्माण झाले आहे. गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवा, मोबाईल चोरांचा त्वरित बंदोबस्त करा यासाठी पोलिस निरीक्षकांशी बैठक घेणार आहे असे शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख म्हणाले

# पालकानी वेळोवेळी आपल्या पाल्याकडे लक्ष देणे महत्वाचे : गृहपाल के.जी.अतकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : शाळेत किंवा महाविद्यालयात आपल्या पाल्याचे नाव घातले वसतीग्रहात दाखल किले म्हणजे पालकांची जबाबरी संपली असे नसून विद्यार्थी विद्यार्थीनीच्या जडण घडणीत पालकांची भुमि काही महत्वाची असून पालकानी वेळो वेळी शाळा महाविद्यालय व वसतीग्रहासी समन्वय साधून आपल्या पाल्यकडे लक्ष देणे ही काळची गरज आहे .असे प्रतिपादन गृहपाल के. जी.उतकर मॅडम यानी अक्कलकोट येथे आयोजित पालक सभेत बोलताना केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वसतीग्रह (मुलिंचे) अक्कलकोट जि.सोलापूर येथें वसतीग्रहतील विद्यार्थीनींच्या पालकांची नुकतच पालकसभा वसतीगृहाच्या गृहपाल श्रीमती के. जी. उतकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या की शासनाने मुलीच्या शिक्षणासाठी वसतिगृहाच्या माध्यमातून बऱ्याच सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचा लाभघेवून मुलींच शिक्षण पुर्ण करून मुलींना स्वतः च्या पायावर उभ करणे त्यांच्यावर चांगले सस्कार करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

प्रारंभी जेष्ठ पालक तथा रिपब्लिकन पार्टी आफ इडिया (आठवले )चे धाराशिव जिल्हा समन्वयक एस. के. गायकवाड,जेष्ठ महिला पालक ललिता भिमा काबळे,यांच्या हस्ते महामानव डॉ.बाबासाहेब आबेडकर व क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले यांच्या



प्रतिमांचे पुजन करून पालक सभेला सुरवात करण्यात आली.

याप्रसंगी एस. के.गायकवाड यांनी ही पालकांच्या वतीने आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सफाईगार के.एस. शिवलकर, पालक मोठ्या सख्येने उपस्थित होते.

# ऋतिक शंकर कदम यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरातील ज्येष्ठ पत्रकार शंकर कदम यांचे पुत्र ऋतिक कदम यांचे वय वर्ष २४ तरुणाचे पंढरपुरातील यमाई तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवार दिनांक २९ जानेवारी रोजी रात्री अकरा वाजता घडली आहे. याबाबत मिळालेली प्राथमिक माहिती अनुसार मयत तरुण ऋतिक कदम हा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अन्नछत्र विभागात कर्मचारी म्हणून कार्यरत होता. त्याचबरोबर तो वकिलीची शिक्षण देखील घेत होता.

रात्रीच्या सुमारास मुळे तरुण वृत्ती कदम यांनी त्याच्या मित्रास फोन करून आपण जीवन संपवत असल्याची माहिती दिली व त्यामुळे त्या मित्रांनी तातडीने यमाई तलावाकडे धाव घेतली मात्र तो पर्यंत ऋतिक कदम यांनी पाण्यात उडी घेतली होती मित्राने घडलेल्या प्रकार तातडीने शंकर कदम यांना कळवला व घटनेची माहिती कळताच नगरपरिषद कर्मचारी पोलीस घटना तरी धाव घेतली व रात्री उशीर पर्यंत देहाची शोध घेतला परंतु मृतदेह मिळून येत नव्हता. त्यामुळे पुन्हा पहाटेपासून शोध कार्य सुरू करण्यात आले पंढरपूर नगरपालिकेच्या पथकासह सुनील कोठाळकर आप्पा करमरकर यांनी मै तरुणाचा मृतदेह बाहेर काढला. यावेळी शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्यासह शहर पोलीस ठाण्यातील कर्मचारी व नगरपालिकेचे कर्मचारी पत्रकार बांधव उपस्थित होते.

त्याला दुपारी तीन वाजता गोपाळपूर वैकुंठ स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज शोत्री, ह भ प. जळगावकर महाराज, हो मंदिर समितीचे अन्नछत्र विभागातील कर्मचारी, व पत्रकार बांधवही उपस्थित होते.

# जवळार्जुन ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अजिंक्य टेकवडे यांची बहुमताने निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी पुरंदर तालुक्यातील अत्यंत प्रतिष्ठेचे व तालुक्याच्या राजकारणाची केंद्रबिंदू व शक्तिस्थान मानल्या जाणाऱ्या जवळार्जुन ग्रामपंचायतच्या मध्यवर्ती निवडणुकीमध्ये सरपंच पदी अजिंक्य अशोक टेकवडे यांची बहुमताने निवड करण्यात आली. माजी सरपंच सोमनाथ कणसे यांनी सरपंच पद स्वीकारल्यापासून मनमानी कारभार करणे, वरिष्ठांचे आदेश न पाळणे, इत्यादी पद्धतीने मनमानी कारभार सुरू केला होता. त्या विरोधात उर्वरित सदस्यांमध्ये तीव्र नाराजी होती याबाबत त्यांनी



विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे तक्रार दाखल केली होती त्या वेळी पुणे आयुक्तांनी त्यांना सरपंच व सदस्य पदावरून काढून टाकले होते. आज युवा नेते अजिंक्य अशोक टेकवडे यांची जवळार्जुन ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी जवळार्जुन गावचे आधारस्तंभ व आदरणीय श्री.आप्पासाहेब (माऊली नाना) मारुती राणे व पुरंदरचे माजी आमदार अशोक भाऊ टेकवडे यांचे मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत सदस्यांनी बहुमताने निवड केली.यावेळी विद्यमान ग्रामपंचायत प्रभारी सरपंच सौ प्रतिभाताई निलेश राणे सदस्य सौ शितलताई सतीश साळुंखे सौ संगीता ताई शिवाजी टेकवडे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीचे ग्रामस्थ व सर्वांनीच स्वागत केले व आनंदोत्सव साजरा केला. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी श्री संजय बडदे यांनी सरपंच पदाचे नियुक्तीपत्र सुपूर्त करून अभिनंदन केले.

**अमृतसर मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी भेट देऊन केले अभिवादन**

**मुख्यमंत्री भगवंत मान यांना राजीनामा देण्याची मागणी**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा नोंदवून कठोर शिक्षा करा - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

अमृतसर/कमलाकर सोनकांबळे : अमृतसरमधील सुवर्ण मंदिरापासुन जवळ असणाऱ्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याच्या घटनेचा आम्ही तिव निषेध करित आहोत.या प्रकरणी अटक केलेल्या माथेफीरु आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा नोंदवून त्यांना कठोरात कठोर शिक्षा करावी.देशद्रोहा सोबत राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम (एन एस.ए)नुसार या आरोपीवर कार्यवाही करावी.अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.अमृतसरमधील पुळा विटंबनेची घटना घडली. त्या ठिकाणी ना.रामदास आठवले यांनी भेट देऊन घटनास्थळाची पहाणी केली. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास त्यांनी विनम्र अभिवादन केले.

अमृतसरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्यापुतळ्यांचीविटंबनाझाल्याचे कळताच अमृतसर,जालंधर,लुधियाणा आदी ठिकाणी दलित बहुजनांनी बंद पुकारुन हायवे जाम केले होते.रिपब्लिकन पक्षातर्फे ना.रामदास आठवले यांनी या प्रकाराचा तीव्र निषेध केला होता.आज ना.रामदास आठवले यांनी अमृतसरमध्ये भेट देऊन घनटास्थळाची पाहणी केली. तसेच गुरुनानक युनिव्हर्सीटी येथे या बाबत शासकीय बैठक घेऊन प्रकरनाची पूर्ण माहिती घेतली.या बैठकीत अमृतसरचे जिल्हाधिकारी साक्षी सोहनी, पोलिस आयुक्त गुरुप्रित भुलर, मनपा आयुक्त गुलप्रितसिंग अवलख आदी अधिकारी उपस्थित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अमृतसरमधील पुतळा विटंबनेतील आरोपीचे नाव आकाशदिप असुन तो २४ वर्षांचा आहे.मोघा जिल्हातिल धरमकोट येथील चुंगा बस्तीत राहणारा मजुर आहे.तो ३ वर्ष अबुधाबीत काम करुन तो गेल्या वर्षी अमृतसरला आला.त्याने प्रजासत्ताकदिनी २६ जानेवारी ला दुपारी ३ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यावर हातोड्याने प्रहार करण्याचा प्रयत्न केला.तेथील संविधान पुस्तीकेचा ही जाळून अवमान केला.महामानवच्या पुतळ्याच्या विटंबनेचा हा अत्यंत निंदनीय संतापजनक प्रकार आहे.या प्रकरणी २६ जानेवारी रोजी सकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी लावण्यात आलेली शिडी का काढण्यात आली नाही. प्रजासत्ताकदिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर पोलिस बंदोबस्त का नव्हता याबाबतचा प्रश्न ना.रामदास आठवले यांनी अधिकाऱ्यांना विचारला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या संरक्षणाची पुरेपुर जबाबदारी पोलिस आणि प्रशासनाने घेऊन सुरक्षेचे उपाय योजन्याचे निर्देश ना.रामदास आठवले यांनी दिले.

> **अमृतसरमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना होण्याच्या घटनेस पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान जबाबदार आहेत. आप चे नेते अरविंद केजरीवाल हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बद्दल फक्त मोठ्या गप्पा मारतात.प्रत्यक्ष मात्र पंजाबमधील आप सरकारचे अमृतसरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या सुरक्षेकडे पूर्ण दुर्लक्ष झाले होते. पंजाबमध्ये दलितांची संख्या मोठी आहे. त्यांच्या बळावर मुख्यमंत्री झालेले आप चे भगवंत मान यांना मुख्यमंत्री पदावर राहण्याचा अधिकार नाही. अमृतसरमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या विटंबनेच्या दुर्घटनेची जबाबदारी स्विकारुन मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली आहे.**

